दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

जिथे गाव.. तिथे वार्तहर..!
महाराष्ट्रात
सातारा सांगली कोल्हापूर रायगड सिंधुदुर्ग
जिल्हा,तालुका,शहर आणि ग्रामीण भागामध्ये
पत्रकार /वार्तहर,छायाचित्रकार आणि जाहिरातदार नेमनेआहेत.
दैनिक जनप्रभात सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
या लोकप्रिय वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
7875613619,883006884
पात्रता
१. समाजसेवेची आवड
२. जनसंपर्क
३. स्मार्ट फोन असणे आवश्यक
४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधीना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ ✻ वर्ष ४ थे ✻ अंक ९३ ✻ पृष्ठ ६ ✻ मूल्य ५.०० RNI NO : MAHAR/2022/82242

शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर

– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, दि. 24 : कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बाजारपेठेचे आणि रोजगाराचे स्वरूप झपाट्याने बदलत असून शासनाने सज्ज आणि सक्षम प्रशासन उभारण्यासाठी शासकीय कामकाजात 'एआय'च्या प्रभावी वापरावर भर देण्यास सुरुवात केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुंबई येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लिडरशिप फोरम 2026 च्या चर्चासत्रात पत्रकार विष्णु सोम यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले विचार व्यक्त केले. या चर्चासत्रात मायक्रोसॉफ्ट इंडियाच्या अध्यक्ष सिंधू गंगाधरन आणि पीडब्ल्यूसीचे अध्यक्ष संजीव कृष्णन यांचाही सहभाग होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शासन यंत्रणेत एआयचा वापर वाढवून सक्षम डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्यावर भर दिला जात आहे. राज्यातील शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय वाढवून एआय-सक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर शासन काम करत आहे. यासाठी मुंबईत राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. बदलत्या तंत्रज्ञानामुळे रोजगाराच्या संधींचे स्वरूप बदलत आहे आणि शिक्षण प्रणालीने त्यानुसार करावयाचे बदल यावर विचारमंथन होईल. शासन, शिक्षण संस्था आणि नॅसकॉमसारख्या उद्योग संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास 'एआय' क्षेत्रात महाराष्ट्र अधिक वेगाने पुढे जाऊ शकतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये भारताचे जागतिक नेतृत्व

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अलीकडेच दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत ब्राझीलच्या मंत्र्यांनी भारताच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या (D P I) अनुभवाच्या आधारे स्वतःची प्रणाली विकसित करत असल्याचे सांगितले. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या बाबतीत भारत सध्या जागतिक नेतृत्व करत आहे.



कृषी क्षेत्रात 'अॅग्रीस्टॅक' आणि 'महाविस्तार' या 'एआय'चा वापर

राज्यात नुकत्याच सुरू झालेल्या 'एआय' 4अॅग्री समिट'चा उल्लेख करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'अॅग्रीस्टॅक' या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याची जमीनधारणा, पिकांची माहिती आणि इतर तपशील एकत्रित केले जात आहेत. त्याचबरोबर 'महाविस्तार' या एआय ॲपद्वारे जनरेटिव्ह एआयचा वापर करून प्रत्येक नोंदणीकृत शेतकऱ्याला वैयक्तिक डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सध्या 30 लाख शेतकरी या प्लॅटफॉर्मवर जोडले गेले आहेत. 'अॅग्रीस्टॅक' आणि 'महाविस्तार' यांचा संगम शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्च 25 ते 40 टक्क्यांनी कमी करण्यास आणि शेतीतील अनिश्चितता कमी करण्यास नक्की मदत करेल.

धोरणनिर्मितीत उद्योगांचा सहभाग

राज्यातील धोरणनिर्मिती आता 'पॉलिसी-लेड ग्रोथ' या मंत्रावर आधारित असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) धोरण तयार करताना विविध उद्योग संघटनांचा सहभाग घेतला गेला.त्यानुसार पुणे शहर हे जीसीसी या परिसंस्थेत देशात अव्वल ठरल्याचे अहवालात नमूद झाले आहे. तसेच लॉजिस्टिक धोरणही लॉजिस्टिक कौन्सिलच्या सहभागातून तयार करण्यात आले असून ते भविष्योन्मुख असल्याचे त्यांनी सांगितले. पुरवठा साखळी व्यवस्थापनात लॉजिस्टिक्सची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत असल्याने या क्षेत्रात एआयचा वापर वाढवण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे. यासाठी नॅसकॉम, सीआयआय (Confederation of Indian Industry) आणि विविध सेक्टर कौन्सिल्ससोबत सहकार्य केले जाणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

'एआय' म्हणजे संधी

'एआय'मुळे रोजगार नष्ट होतील, या भीतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संगणक क्रांतीच्या वेळीही अशीच भीती व्यक्त करण्यात आली होती. मात्र भारताने त्या क्रांतीचा लाभ घेत आयटी क्षेत्रात मोठी झेप घेतली. आता 'एआय'कडे पर्याय म्हणून नव्हे तर प्रगतीची संधी म्हणून पाहिले पाहिजे. रोजगाराचे स्वरूप बदलेल, नव्या संधी निर्माण होतील. आज 'क्रिएटर' हा व्यवसाय अस्तित्वात आला आहे; तो दहा वर्षांपूर्वी कल्पनेतही नव्हता, असे ते म्हणाले. त्याचबरोबर, नव्या पिढीने तंत्रज्ञान आत्मसात केले असून बदल स्वीकारण्याची मानसिकता महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

महाज्योतीचे कोणतेही प्रशिक्षण बंद नाही; विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार ऑनलाईन प्रशिक्षणाचा निर्णय

मुंबई, दि. 24 : महाज्योती मार्फत राबविण्यात येणारे सर्व स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून कोणताही कार्यक्रम ठप्प नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या मागणीचा विचार करून काही प्रशिक्षण कार्यक्रम ऑनलाईन स्वरूपात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रकल्प संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. महाज्योतीकडून एकूण 11 प्रकारचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. त्यापैकी संघ लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) चे राज्यसेवा व संयुक्त गट ब व क तसेच मिलिटरी भरती प्रशिक्षण या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरूपात देण्यात येत आहे. त्यातील संघ लोकसेवा आयोग प्रशिक्षणाचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये 13 हजार विद्यावेतन, एकवेळ रुपये 18 हजार आकस्मिक निधी प्रदान करण्यात येतो. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे राज्यसेवा व संयुक्त गट-ब व क तसेच मिलिटरी भरती प्रशिक्षण कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रतिमाह रुपये 10 हजार विद्यावेतन, एकवेळ रुपये 12 हजार आकस्मिक निधी प्रदान करण्यात येतो. त्यामुळे या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या स्वरूपात कोणताही बदल करण्यात आलेला नसून विद्यावेतन, आकस्मिक निधी नियमित चालू राहणार आहे. z2025-26 या आर्थिक वर्षात महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा प्रशिक्षणातून 298, कर्मचारी निवड आयोग प्रशिक्षणात 499, मिलिटरी भरती प्रशिक्षणात 1500, एमबीए सीएटी/सीएमएटी-सीईटी प्रशिक्षणात 1500, यूजीसी एनईटी/सीएसआयआर/एमएच-एसईटी प्रशिक्षणात 1200 तर यूपीएससी प्रशिक्षणात 400, एमपीएससी गट ब व क मध्ये 400, एमपीएससी राज्यसेवा प्रशिक्षणात 300 तर जेईई, एनईईटी-एमएच-सीईटीप्रशिक्षणात 3500 विद्यार्थ्यांना आतापर्यंत लाभ देण्यात आलेला आहे. या शिवाय आयबीपीएस पीओ/बँकिंग / रेल्वे प्रशिक्षण, कर्मचारी निवड आयोग (एसएससी), रेल्वे भरती (आरआरबी) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अभियांत्रिकी सेवा या परीक्षांचे स्वरूपच ऑनलाईन पद्धतीने असल्याने सदर प्रशिक्षण हे ऑनलाईन पद्धतीने 2026-27 या आर्थिक वर्षापासून राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. या विद्यार्थ्यांना घरूनच प्रशिक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्याने निवास-भोजन व्यवस्था व्हावी या हेतूने देण्यात येणाऱ्या विद्यावेतनाऐवजी टॅबलेट तसेच डेटा सीम देण्यात येणार आहे. प्रशिक्षण ऑनलाईन स्वरूपात देण्याबाबत विद्यार्थ्यांनी अनेकवेळा महाज्योती कार्यालयाकडे मागणी केलेली होती. तसेच मार्च, 2025 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात

महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

प्रशिक्षण ऑनलाईन करण्याबाबत विधानपरिषदेत चर्चा देखील झालेली आहे. महाज्योतीकडे ऑनलाईन प्रशिक्षणासाठी 44,903 अर्ज प्राप्त झालेले असून त्यातील एमपीएससी अभियांत्रिकी प्रशिक्षणासाठी 4,839, एस.एस.सी. प्रशिक्षणासाठी 14,447बँकिंग/रेल्वे/एलआयसी करिता 18,265 तर आरआरबीप्रशिक्षणासाठी ७,३५२ अर्ज प्राप्त झालेले आहे. यावरून विद्यार्थ्यांची ऑनलाईन स्वरूपात प्रशिक्षण देण्यासाठी मागणी असल्याचे दिसून येते. जेईई/एनईईटी/एमएचटी-सीईटीचे प्रशिक्षण हे ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना २०२१ पासून ऑनलाईन स्वरूपात देण्यात येत आहे. सदरचे विद्यार्थी हे महाविद्यालयात शिक्षण घेत हे प्रशिक्षण घेत असल्याने त्यांना एका ठिकाणी त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण सोडून प्रशिक्षणासाठी आणणे उचित होणार नसल्याने त्यांचे प्रशिक्षण हे ऑनलाईन स्वरूपात देण्यात येत आहे. या प्रशिक्षणासाठी ४१८०३ विद्यार्थ्यांनी महाज्योती संस्थेकडे अर्ज केलेले होते. यावरून विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रशिक्षांसाठी मागणी असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या टॅबलेटचा बॅटरी बॅकअप चांगला असल्याने एकदा चार्ज केल्यावर किमान 12 तास त्याचा वापर करता येणार आहे. त्यामुळे वीज खंडित झाल्यावरही शिक्षणात खंड पडणार नाही. या शिवाय विद्यार्थ्यांना या आधी केवळ एअरटेल व व्हिआय या दोनच कंपन्यांचे सीम देण्यात येत होते, मात्र विद्यार्थ्यांना आता त्यांच्या गावात ज्या सीमचे नेटवर्क आहे ते सीम घेण्याची मुभा देण्यात आलेली असून त्यामुळे इंटरनेट सुविधेचाही प्रश्न सुटणार आहे.

अनेक होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे पार्ट टाईम जॉब करावा लागतो तसेच अनेक गृहिणींना देखील घरकामामुळे पुणे किंवा इतर शहरात येऊन प्रशिक्षणाचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे अशा होतकरू व हुशार विद्यार्थ्यांना देखील प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ मिळावा हा प्रशिक्षण ऑनलाईन स्वरूपात देण्याचा महत्वाचा हेतू आहे. ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमात विद्यार्थ्यांना लाईव्ह मार्गदर्शन होणार असून त्यांचे शंका निरसन देखील त्यात करण्यात येणार आहे. याशिवाय दर आठवड्याला परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. या शिवाय प्रशिक्षणासाठी आवश्यक नोट्स व पुस्तके ही देखील पीडीएफ स्वरूपात विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होता त्यांना अत्याधुनिक पद्धतीने दर्जेदार प्रशिक्षण देण्याचा महाज्योतीचा मानस आहे. तसेच महाज्योतीकडे ऑनलाईन प्रशिक्षणासाठी 44,903 विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत. यावरून ऑनलाईन प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे दिसून येते. वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, कोणतेही प्रशिक्षण कार्यक्रम ठप्प नसून चालू आर्थिक वर्षात प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झालेले असून विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करता तसेच प्रशिक्षणाबाबत सर्वांगीण विचार करूनच ऑनलाईन प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू २५ फेब्रुवारी रोजी शेगाव येथे करणार राष्ट्रीय आरोग्य मेळावा – २०२६ चे उद्घाटन

बुलढाणा (जिमाका) दि. 24 :

भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 25 ते 28 फेब्रुवारी 2026 दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा "राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026" आयोजित करण्यात आला आहे.

औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे , सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय आरोग्य मेळावा-2026 चे उद्घाटन बुधवार 25 फेब्रुवारी 2026 रोजी मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभ संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे. या संपूर्ण मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा, होमिओपॅथी आणि इतर पारंपारीक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि औषधे घेण्याची संधी मिळेल.

आयुष क्षेत्रातील उत्कृष्ट उत्पादन पद्धती, गुणवत्ता मानके आणि अलीकडील संशोधन प्रदर्शित करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित आयुष औषधनिर्माण आणि वेलनेस कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दैनंदिन आरोग्य गरजांसाठी औषधी वनस्पती आणि साध्या घरगुती उपचारांचे समर्पित प्रदर्शन देखील या मेळाव्यात भरवले जाणार आहे. बुलढाणा जिल्हा आणि आसपासच्या भागातील शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा शाश्वत आणि लाभदायी स्रोत म्हणून कृषी वनीकरण आणि औषधी वनस्पतींची लागवड स्वीकारण्यास प्रोत्साहन देणारा एक विशेष उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आला असून,तो या राष्ट्रीय आरोग्य मेळावा -2026 चे एक प्रमुख आकर्षण आहे. दि. 27 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 3.00 वाजता शेगाव येथील विसावा परिसरात "आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन" या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्यात, शेतकऱ्यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल जेणेकरून पारंपारिक शेती करणाऱ्यांना आयुर्वेदिक शेतीसह ते करता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांना आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवडीची क्षमता शोधण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचा काही भाग औषधी वनस्पतींसाठी राखून ठेवल्याने शेतकऱ्यांना शाश्वत आणि लाभदायी उत्पन्न मिळेल, तर नागरिकांना उच्च दर्जाचे नैसर्गिक उपचार पर्याय उपलब्ध होतील आणि आयुष मूल्य साखळी अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील नागरिक, शेतकरी, बचत गट, विद्यार्थी, आरोग्य स्वयंसेवक आणि आयुष भागधारक यांनी शेगावला भेट देऊन राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026 चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपादकीय...

माणसाच्या विचारांचा गंध

"बाबा, किती वेळा सांगितलं तुम्हाला? डायपर घालता येत नसेल तर अंथरुणात पडू नका. संपूर्ण घरभर वास सुटला. आज माझे क्लायंट्स घरी येणार आहेत. तुमची ही 'घाण' मला आता सहन होत नाही." सुमितने रागाने आपल्या ७० वर्षांच्या वडिलांच्या, आप्पांच्या अंगावर चादर फेकत आरडाओरडा केला. एके दिवशी सकाळी सुमितच्या घरी एक महत्त्वाची मीटिंग होती. त्याच वेळी आप्पांची (वडिलांची) तब्येत बिघडली आणि त्यांची अंथरुणातच लघवी झाली. यामुळे पूर्ण खोलीत वास सुटला. सुमितला उशीर होत होता आणि त्या वासाने त्याला मळमळायला लागले. तेव्हा त्याचा तोल सुटला आणि तो वडिलांचा अपमान करायला लागला. आप्पा थरथरत्या हाताने कोप-यात मान खाली घालून बसले होते. त्यांच्या डोळ्यातून पाणी वाहत होतं. इतक्यात स्वयंपाकघरातून सुमितची बायको जानकी बाहेर आली. तिच्या हातात गरम पाण्याचे भांडे होते. तिने ते जोरात टेबलवर आपटले. तिने सुमितकडे बघत शांत पण कणखर आवाजात म्हटलं, "सुमित, आवाज खाली! ज्या हातांनी आजवर तुझी 'घाण' साफ करून तुला मोठं केलं, त्याच हातांना आज तुला सांभाळता येत नाही? वास त्यांच्या आजाराचा नाही, तुझ्या सडलेल्या विचारांचा येतो आणि ऐक... क्लायंट्स महत्त्वाचे असतील तर त्यांना हॉटेलमध्ये घेऊन जा. हे घर 'आप्पांचं' आहे आणि जोवर मी जिवंत आहे, तोवर या घरातला 'राजा' तेच राहतील."

कोकणातल्या एका गावातलं एक कौलारू घर. तिथे 'आप्पा' म्हणजे शंकरराव सर राहत होते. आयुष्यभर शाळेत शिकवून हजारो मुलं घडवली. स्वतःचा मुलगा सुमित हुशार होता म्हणून त्यांनी आपल्या जमिनीचा तुकडा आणि आंब्याची बाग विकून त्याला पुण्यात इंजिनिअरिंगला शिकवलं. सुमितने पुण्यात नोकरी मिळवली, फ्लॅट घेतला आणि जानकीशी लग्न केलं. जानकी अनाथ होती, तिला आई-वडील नव्हते. लग्नानंतर जेव्हा ती पहिल्यांदा आप्पांच्या पाया पडली, तेव्हा आप्पांनी तिच्या डोक्यावर हात ठेवून सांगितलं होतं, "पोरी, सून न्हाय लेक म्हणून रहा." आप्पांना पार्किन्सन झाला होता. त्यामुळे त्यांचे हात थरथरायचे. एकटे राहणं कठीण झालं म्हणून सुमितने त्यांना पुण्यात आणलं. पण पुण्यातला सुमित आता कोकणातला सुमित राहिला नव्हता. हाय-प्रोफाईल सोसायटी, पार्ट्या आणि स्टेटसच्या नादात त्याला बापाची अडचण वाटू लागली. जानकी मात्र आप्पांची आई झाली होती. ती त्यांना वेळेवर औषधं देण्यापासून ते त्यांचे कपडे बदलण्यापर्यंत सगळं करायची. एकदा रात्री जेवताना आप्पांचा हात थरथरला आणि डाळीची वाटी सांडली. डाळ सुमितच्या ब्रँडेड पँटवर पडली. सुमित ताडकन उठला. "शिट! बाबा, तुम्हाला नीट खाता येत नाही का? प्राण्यासारखं खाता तुम्ही. उद्यापासून तुम्ही किचनमध्ये खाली बसून जेवत जा. डायनिंग टेबलवर नको." आप्पांच्या डोळ्यात पाणी आलं. त्यांनी अर्धंच जेवण सोडलं. जानकीने त्या रात्री सुमितशी भांडण केलं नाही, पण तिनेही जेवण सोडलं. ती आप्पांच्या खोलीत गेली. त्यांना हाताने भरवलं आणि म्हणाली, "आप्पा, तुम्ही नका मनावर घेऊ. त्याला कामाचा ताण आहे." पण आप्पांना कळत होतं की आपला मुलगा आपल्याला कंटाळला. डॉक्टरांनी आप्पांसाठी एक नवीन इंजेक्शन लिहून दिलं होतं, जे थोडं महाग होतं. जानकी सुमितला म्हणाली, "सुमित, बाबांची औषधं संपली आहेत. त्यासाठी ८००० रुपये हवेत." सुमित चिडला आणि म्हणाला, "जानकी, तू समजून का घेत नाहीस? पुढच्या महिन्यात मला नवीन कार घ्यायची आहे. या म्हाता-याच्या औषधांवर दर महिन्याला इतका खर्च आणि काय फरक पडणार आहे? त्यांचं वय झालंय आता." जानकीला धक्का बसला. स्वतःच्या बापाच्या जीवापेक्षा मुलाला कार महत्त्वाची वाटत होती. त्या दिवशी जानकीने स्वतःचे सोन्याचे कानातले मोडले आणि आप्पांची औषधं आणली. सुमितला हे समजलं नाही. सुमितची मुलगी पिहूचा वाढदिवस होता. मोठी पार्टी होती. सुमितने आप्पांना धमकी दिली, "खबरदार जर खोलीच्या बाहेर आलात तर. माझे मित्र येणार आहेत, मला तुमची लाज वाटते." त्याने बाहेरून आप्पांच्या खोलीला कडी लावली. आत पंखा बंद होता आणि खूप उकडत होतं. पार्टी संपल्यावर जानकी जेव्हा कडी उघडून आत गेली, तेव्हा आप्पा घामाने भिजून बेशुद्ध पडले होते. त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता. जानकीने आरडाओरडा केला, डॉक्टरांना बोलावलं. सुमित मात्र निर्विकार होता. "काय नाटकं आहेत यांची." असं तो पुटपुटला. या प्रसगानंतर दोन दिवसांनी सुमित घरी लवकर आला. तो खूप गोड बोलत होता. "बाबा, तुम्हाला इथे कोंडल्यासारखं वाटत असेल ना? माझ्या एका मित्राने लोणावळ्याला एक 'नेचर केअर सेंटर' काढलं. तिथे खूप झाडं आहेत, तुमच्या वयाची माणसं आहेत. तुम्ही तिथे राहायला जा. खूप मज्जा येईल." आप्पांना वाटलं मुलाला आपली काळजी वाटते. तितक्यात सुमितने एक फॉर्म काढला, "फक्त इथे अंगठा द्या." आप्पा अंगठा देणार इतक्यात जानकीने तो कागद हिसकावून घेतला. तिने वाचलं. तो 'आनंदाश्रम' नावाचा एक स्वस्त वृद्धाश्रम होता, जिथे एकदा माणसाला सोडलं की घरचे लोक जबाबदारीतून मुक्त होतात. त्या फॉर्मवर लिहिले होते, "पालकांचा ताबा सोडत आहोत." जानकीने तो कागद फाडून सुमितच्या तोंडावर फेकला. "सुमित, इतका खाली घसरलास तू? ज्या बापाने पोटाला चिमटा घेऊन तुला इंजिनिअर केलं, त्यांना तू भंगारातल्या वस्तूंसारखा घराबाहेर काढतोस?" सुमित ओरडला, "हो! काढणार! मला माझं आयुष्य जगायचं आहे. हे म्हातारं ओझं मला नको आता आणि जानकी तू मध्ये बोलू नकोस. तू माझी बायको आहेस, या घराची मालकीण नाही. तुला जर यांची इतकीच सेवा करायची असेल, तर तू पण चालती हो." सुमितला वाटलं जानकी घाबरेल. पण जानकीने कपाटातून आपली बॅग काढली. तिने आप्पांचा हात पकडला. आप्पा रडत होते, "नको पोरी, माझ्यापायी तुझा संसार मोडू नकोस. मी जातो आश्रमात." जानकीने आप्पांचे अश्रू पुसले आणि सुमितकडे बघून म्हणाली, "सुमित, संसार दोघांचा असतो रे, पण तिथे माणुसकी असावी लागते. जिथे माझ्या बापाचा सन्मान नाही, तिथे मला राहायचंच नाही. मी अनाथ होते, पण या माणसाने मला मुलगी मानलं. आज रक्ताचा मुलगा वैरी झाला, पण ही परकी मुलगी शेवटच्या श्वासापर्यंत बापाची काठी होईल. मी घटस्फोटाची नोटीस पाठवते, सह्या करायला तयार रहा." जानकी आणि आप्पा त्या रात्रीच घर सोडून निघाले. बाहेर पाऊस पडत होता. त्यांच्याकडे जायला जागा नव्हती. त्यांनी ती रात्र एसटी स्टँडच्या बाकावर काढली. दुस-या दिवशी जानकीने आपल्या जुन्या मैत्रिणीच्या मदतीने एक छोटी खोली भाड्याने घेतली. जानकीने पुन्हा ट्युशन्स घ्यायला सुरुवात केली. तिने दिवसरात्र कष्ट केले. आणितीन वर्षांनंतर... एका मोठ्या हॉलमध्ये 'आदर्श शिक्षिका आणि समाजसेविका' म्हणून जानकीचा सत्कार चालू होता. स्टेजवर जानकी माईकवर बोलत होती आणि खाली प्रेक्षकांमध्ये आप्पा आता ठणठणीत बरे होऊन अभिमानाने टाळ्या वाजवत होते. जानकी म्हणाली, "लोक म्हणतात सासू-सासरे त्रास देतात, पण कधीकधी आपणच त्यांना समजून घेण्यात कमी पडतो. मी आज जी काही आहे, ती माझ्या या बाबांमुळे आहे." कार्यक्रमाच्या शेवटी एक फाटका माणूस तिथे आला. तो सुमित होता. गेल्या तीन वर्षात शेअर मार्केटमध्ये नुकसान होऊन आणि एकटेपणामुळे तो खचला होता. त्याला वाटलं जानकी आणि आप्पा त्याला माफ करतील. तो आप्पांच्या पाया पडायला गेला. जानकीने त्याला अडवलं. "सुमित सर, इथे फक्त 'निमंत्रित' लोकांना प्रवेश आहे. ज्यांनी नाती तोडली, त्यांना परत जोडायला फेविकॉल मिळत नाही. तुम्ही जाऊ शकता." सुमित रिकाम्या हाताने परत फिरला. त्याला जाणवलं की त्याने हिरा (बायको) आणि देव (बाप) दोन्ही गमावले होते. आप्पांनी जानकीकडे पाहिलं. "पोरी, तू खूप कठोर झालीस." जानकीने आप्पांचा हात आपल्या हातात घेतला आणि डोळ्यात पाणी आणून म्हणाली, "आप्पा, ज्या झाडाने मला उन्हात सावली दिली, ते झाड म्हातारं झालं म्हणून त्याला तोडून कसं टाकू? तुम्ही माझं ओझं नाही, तर माझ्या घराचं 'मूळ' आहात! आणि ज्यांना हे ओझं वाटलं, त्यांचा भार आपण स्वतःहून कमी केला."

शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे
कमळवेल्ली,यवतमाळ
भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९

संत अवतार मेहेर : आशीर्वादांचा बाग निर्माते!

(25 फेब्रुवारी : अवतार मेहरबाबा जयंती विशेष.)



दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. चला तर मग, जयंतीनिमित्त जाणून घेऊया मेहेरबाबा यांच्या जीवनाचे पावन चरित्र श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दांत... संपादक.

हजरत बाबाजान या आध्यात्मिक महिलेशी भेट झाल्यांनंतर मेहेरबाबा यांनी अन्य चार महान सद्गुरुंशी संपर्क साधला. त्यात ताजुद्दीन बाबा, नारायण महाराज, शिर्डीचे साईबाबा आणि उपासना महाराज यांचा समावेश होता. मेहेरबाबा यांच्यानुसार हे पाच गुरुश्रेष्ठ होते, की ज्यांच्यात ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होता. त्यांनतर मेहेरबाबांनी कॉस्मोपॉलिटन क्लबची स्थापना केली, जे जगातील धर्मादाय संस्थांना पैसे देण्यास समर्पित होते. मेहेरबाबा हे बहुवाद्य वादक आणि कवी देखील होते. बऱ्याच भाषांमध्ये ते अस्खलितपणे



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप-
९४२३७१४८८३.

बोलत. त्यांना विशेषतः शेक्सपियर आणि हाफिज यांच्या कविता फार आवडत असत. इ.स.१९२२मध्ये मेहेरबाबा आणि त्यांच्या अनुयायांनी बॉम्बे- आताचे मुंबई येथे मंजिल-ए-मीम-हाऊस ऑफ मास्टरची स्थापना केली. तेथे बाबांनी कठोर शिस्त आणि त्यांच्या शिष्यांना आज्ञाधारकता मागणी करण्याची प्रथा प्रारंभ केली. एका वर्षांनंतर बाबा आणि त्यांची मंडळी अहमदनगर जवळील एका ठिकाणी गेले. ज्याचे नाव त्यांनी मेहेराबाद-आशीर्वादांचा बाग असे ठेवले. सन १९२०च्या दशकात बाबांचे हे आश्रम त्यांच्या कामाचे केंद्र बनले. पुढे मेहेराबादमध्ये त्यांनी शाळा व दवाखाना उघडले. ते त्यांनी सर्व जाती-धर्मांसाठी विनामूल्य खुले केले होते. अवतार मेहेरबाबा यांचा जन्म दि.२५ फेब्रुवारी १८९४ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात एका झोरास्ट्रियन कुटुंबात झाला. मेहेरबाबा यांचे मूळ नाव मेरवान शेरियार इराणी असे होते. सुरुवातीच्या काळात त्यांची आई व वडील इराणमध्ये राहायचे, नंतर ते भारतात स्थलांतरित झाले. त्यांचे वडील हे परमेश्वराचे अस्सल साधक होते. अध्यात्म श्रेणीरचनाद्वारे त्यांना सांगण्यात आले होते, की साक्षात्कार होऊन देव त्यांच्या पुत्ररूपात त्यांच्याकडे येईल. यासोबतच जन्म झाला तो म्हणजे एका महान अध्यात्मिक गुरु अवतार मेहेरबाबांचा. जन्मानंतर मेहेरबाबांनी आपले शालेय शिक्षण ख्रिश्चन हायस्कूलमध्ये केले असून डेक्कन कॉलेज मधून उच्च शिक्षण प्राप्त केले होते. डेक्कन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतांना मेहेरबाबा यांची भेट हजरत बाबाजान म्हणजे एका अफगाणिस्थानी वृद्ध महिलेशी झाली. जी पुण्यातील एका रोडवर असलेल्या निंबाच्या झाडाखाली रहायची. त्याकाळात हजरत बाबाजान यांची अध्यात्मिक गुरु म्हणून प्रसिद्धी होती. मेहेरबाबा यांच्यानुसार हजरत बाबाजान या ईश्वर साक्षात्कार प्राप्त आत्मा होत्या. त्या पाच महान सद्गुरुंपैकी एक होत्या. हजरत बाबाजान यांनी मेहेरबाबा यांच्या कपाळाचे चुंबन घेऊन त्यांच्या मनात आध्यात्मिक प्रवृत्ती जागृत केली होती. मेरवान शेरियार इराणी अर्थातच अवतार मेहेरबाबा हे भारतातील गूढवादी, धार्मिक आणि अध्यात्मिक गुरु होते. वयाच्या ६०व्या वर्षी त्यांनी घोषित केले, की ते या युगातील 'अवतार' आहेत. अवतार म्हणजेच स्वर्गात राहत असणारे देव पृथ्वीवर मनुष्याचा जन्म घेतात. दि.१० जुलै १९२५पासून आपल्या जीवनातील शेवटच्या श्वासापर्यंत मेहेरबाबांनी मौन धारण केले. आपले अनुयायी आणि अन्य लोक यांच्याशी त्यांनी हातवारे करून तसेच फलकावर शब्दांचा उपयोग करून संवाद साधला. जाती-धर्माचा भेद न बाळगता मेहेरबाबांनी गरीब, मानसिक आजार आणि संसार तापांनी त्रस्त रुग्णांसाठी आश्रम, शाळा व दवाखाने हे विनामूल्य सुरु केले होते. जुलै १९२५मध्ये धारण केलेल्या मौनी वृत्तीप्रमाणे मेहेरबाबा हे आपल्या जीवनातील शेवटच्या क्षणापर्यंत शांत राहिले. दि.३१ जानेवारी १९६९ रोजी या महान गूढवादी आणि अध्यात्मिक गुरुचे निधन झाले. !! पावन जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !!

घूळखात ..

मंत्रालयात फाईली
पडतात धूळ खात
कागदपत्रे सु योग्य
कुणी ना लावे हात

विनंत्या रात्रं दिवस
कैकदा जोडले हात
बदलून टाकले चित्र
जरा ओले करे हात

जे जे होते विरोधात
आतादेऊ लागेसाथ
सटासट हले फाईल
जादू होई अकस्मात

सह्याही अर्ध्या रात्री
शिक्केबसे एकजात
क्लीअर करे फाईल
लाचखोर जन्मजात

होत्याचे नव्हते केले
क्षणार्धात वाता हात
माहीत न स्कॅममध्ये
कुणाचे गुंतलेत हात

सामान्य मात्र बिचारे
ते फसवले हातोहात
कसे कळे मिडियास
कुणी केला बा घात

सोयरेसुतक न कुणा
तिकडे होई घातपात
संधी निसटे हातातून
दाखवी चांगला हात

– हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

तुलना ..

महा पुरुषांशी कुणां
करतो उगाचं तुलना
न कळत शब्द घसरे
करु बसे अवहेलना

भडकू लागते दंगली
ठिणगी पुरी ज्वलना
आधीचं रे विस्पोटक
तीव्र धार्मिक भावना

उगाचं काढ कुरापती
शांती मुळी पाहवेना
घसरे माझा टिआरपी
स्वस्थ काही राहवेना

सळसळ फिरे जिव्हा
सारखी चाले वल्गना
उद्रेक होणारं भलता
संपूर्ण असते कल्पना

बातमी विस्पारी डोळे
असाच रंगूद्या सामना
ब्रेकिंग न्यूज रंगताना
परि पूर्ण मनो कामना

कष्टाची राष्ट्रीय संपदा
नष्टकरतोय संसाधना
फायदे वैयक्तिक पाहे
भ्रष्ट नष्ट सारी साधना

न कारात्मक दुर्विचार
धुळीस मिळवे वारसा
तरी ही मना ना वेदना
बोथट मानवीसंवेदना

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

नरसिंह हायस्कूल धोम येथे २८ फेब्रुवारीला विधी सेवा महाशिबीर;

शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी

वाई प्रतिनिधी (प्रशांत थोरवे)

धोम : नागरिकांना विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ एकाच ठिकाणी मिळावा या उद्देशाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सातारा यांच्या वतीने वाई तालुक्यात विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नरसिंह हायस्कूल, धोम येथे 'विधी सेवा व शासकीय योजनांसाठी महाशिबीर आयोजित करण्यात आला आहे.या महाशिबीराचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयातील माननीय न्यायमूर्ती यांच्या हस्ते होणार असून नागरिकांना मोफत कायदेशीर मार्गदर्शन देण्यात येणार आहे. विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात येणार आहेत. महिला, शेतकरी, कामगार, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांगांसाठी असलेल्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन केले जाणार असून काही सेवांसाठी तात्काळ अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यासोबतच आधार कार्ड, आयुष्मान कार्ड आदींची नोंदणी व अद्ययावत



करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे. आरोग्य तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून रक्तदाब व मधुमेह तपासणी तसेच मोफत औषधोपचाराची सोय करण्यात येणार आहे.दरम्यान, मंगळवार दि. २४ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सातारा यांच्या सचिव श्रीमती एन. एन. बेदरकर, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्री. ए. जी. देशमुख व श्री. ए. ए. पाचरणे, तसेच दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) श्री. आर. एम. भेंडे व श्री. व्ही. बी. शेट्टी यांनी नरसिंह हायस्कूल येथे भेट देऊन महाशिबिराच्या तयारीचा आढावा घेतला. कार्यक्रमासाठी करण्यात येणाऱ्या व्यवस्था, विविध विभागांच्या स्टॉलची मांडणी, नोंदणी कक्ष, नागरिकांच्या बसण्याची व्यवस्था, पार्किंगची सुविधा तसेच आरोग्य तपासणी विभागाची पाहणी करण्यात आली.यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यक्रम सुयोग्य पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या. महाशिबिरास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना करण्यात आल्या. तसेच नागरिकांना शासकीय योजनांची माहिती सोप्या पद्धतीने मिळावी यासाठी प्रत्येक विभागाने स्वतंत्र माहिती कक्ष उभारावेत, असेही सांगण्यात आले.यावेळी नरसिंह हायस्कूलचे मुख्याध्यापक देसाई सर व शाळेचा संपूर्ण कर्मचारीवर्ग उपस्थित होता. तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महाशिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष व प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सातारा माननीय श्री. अरविंद शं. वाघमारे साहेब यांनी केले आहे.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता. आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) **RNI NO : MAHMAR/2022/82242**

दिवसाढवळ्या सोनेव्यापाऱ्याची बॅग लंपास; अडीच लाखांची रोकड व दागिन्यांसह चोर फरार

सातारा कराड/अमोल पवार: उंब्रज (ता. कराड) येथील चोरे रोड परिसरात सोमवारी (दि. 23) सकाळी सुमारे 10 वाजण्याच्या सुमारास दिवसाढवळ्या धाडसी चोरीची घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, चोरे रोड परिसरात गणेश यादव (चोरेकर) यांचे "वाग्देवी ज्वेलर्स" नावाचे दुकान आहे. नेहमीप्रमाणे यादव हे सकाळी दागिन्यांची बॅग घेऊन दुचाकीवरून दुकानात आले. त्यांनी दुचाकी उभी करून दुकानाचे शटर उघडण्यासाठी जात असताना एका कुलूपात मेन भरले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कुलूप उघडण्यास विलंब होत असताना गाडीला अडकवलेली सोन्याची बॅग अज्ञात चोरट्याने क्षणात लंपास केली.चोरटा दुचाकीवरून भरधाव वेगाने पसार झाला. संबंधित बॅगेत सुमारे अडीच लाख रुपये रोकड, आठ तोळे सोन्याचे दागिने आणि सुमारे पाच किलो चांदी असा ऐवज असल्याची माहिती मिळाली आहे.घटनेनंतर व्यापारी गणेश यादव यांनी तात्काळ चोरट्याचा पाठलाग करत आरडाओरडा केला; मात्र चोरटा पळून जाण्यात यशस्वी झाला.घटनेची माहिती मिळताच उंब्रज पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक रमेश ठाणेकर व पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. श्वानपथकाला पाचारण करण्यात आले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.अश्या घटना वारंवार होत असल्याने पोलिसांसमोर चोरट्यांना पकडण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.प्राथमिक अंदाजानुसार चोरट्याने पूर्वनियोजन करून, रेकी करत ही चोरी केल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.



रविंद्रनाथ टागोर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळावा संपन्न

कंधार (संतोष कांबळे) रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा कंधार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रप्रमुख माधव कांबळे व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पुजनाने करण्यात आले. यावेळी नगरसेवक दिलीप पवार ,नगरसेवक दिलीप देशमुख, माजी पंचायत समिती सदस्य उत्तम चव्हाण, खाजगी शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष भास्कर कळकेकर,संस्थेचे सचिव तथा भाजपा मंडळ अध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार, मुख्याध्यापक बसवेश्वर मंगनाळे, दिगंबर वाघमारे, मोहम्मद अन्सारोद्दीन,हरिहर चिवडे ,श्री जमीर सर, यन्नावार शिवण, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव यन्नावार, श्री शिवकुमार बच्चेवार, पत्रकार महंमद सिकंदर, राजेश्वर कांबळे, माधव भालेराव, शुभम केंद्रे,अविनाश कदम, रमाताई कठारे, सेवानिवृत्त मुख्याध्यापिका सिंधुताई यन्नावार, मुख्याध्यापक सुभाष मुंडे, यांच्यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते. यावर्षीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम ही महाराष्ट्राची "लोककला" ही होती यामध्ये लावणी, भारुड, वासुदेव, पोवाडा, गोंधळ, तमाशा अशा पारंपरिक लोककलांचा समावेश होता विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट नृत्याविष्काराने या लोककला सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. लोककला सह बॉलिवुड साँग, शिवाजी महाराजांची स्तुतीपर गीते, धार्मिक गीते, रिमीक्स गीते सादर केली, यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे नियोजन व दिग्दर्शन सहशिक्षक श्रीमती मंजुषा यन्नावार, श्रीमती यास्मीन शेख, श्रीमती परोडवाड, श्री तारकेश तपासे, श्री रोहिदास सुर्यवंशी, श्री एकनाथ तिडके, यांनी केले. यावेळी प्रास्ताविक गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले तर मनोगत उत्तम चव्हाण, माधव कांबळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारा सांस्कृतिक कार्यक्रम घेणे म्हणजेच विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा अविष्कार घडवणे होय असे ते म्हणाले, सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन एकनाथ तिडके यांनी केले.



पुणे येथे 22 फेब्रुवारी गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना लोकार्पण सोहळा व कलशारोहण भव्य दिव्य कार्यक्रम सपन्न.!

प्रतिनिधी (कांताभाऊ राठोड) गोर बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज, माता जगदंबा माता यांचे भव्य दिव्य मंदिर पुणे जिल्ह्यातील दिघी,भोसरी येथे निर्माण झाले असून याचं औचित्य साधून दि.22 फेब्रुवारी गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना व कलशारोहण भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमास गोर बंजारा समाजाचे पोहरादेवी धर्मगुरू शेखर महाराज व राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांच्या प्रमुख उपस्थित मध्ये सपन्न झाले.या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून धर्मगुरू रायसिंग महाराज, महंत सिद्धलिंग महाराज, महंत हिमत महाराज,उद्योजक संतोष पवार, नगरसेवक नितीन काळजे,सचिन तापकीर,सचिन लांडगे, कविताताई भोंगाळे, उद्योजक सुबोध पवार,सह धार्मिक क्षेत्रातील व विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य दिव्य कार्यक्रम तीन दिवसीय आयोजित करण्यात आले होते दि.20 - 21 फेब्रुवारी व 22 फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यक्रम गोर बंजारा तीर्थक्षेत्र मंदिर स्थापना व कलशारोहण झाले या मध्ये भव्य मिरवणूक रॅली, आतिषबाजी, बंजारा भजनाचा कार्यक्रम, महाआरती, होम हवन, आरती महाप्रसाद आणि दर्शन सोहळा सपन्न झाले शेकडो बंजारा महिला समाज बांधव युवक वर्ग या धार्मिक कार्यक्रमात सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. "गोर बंजारा तीर्थक्षेत्र दिघी भोसरी पुणे येथे" मातो टिकेर जागा निर्माण हेगीछ" गोर बंजारा समाजाच्या धर्मसत्ता मजबूत करण्यासाठी संत सेवालाल महाराज,माता जगदंबा माता आणि धर्मगुरू रामराव महाराज यांच्या विचार जगभर पोहचण्यासाठी "मंदिर" निर्माण करून त्या पवित्र ठिकाणांहून समाजाला एकसंघ करून संतांचे विचार जगभर पोहचण्यासाठी आणि सामाजिक एकोपा निर्माण करण्यासाठी आणि हिताचे कार्य घडेल त्या साठी मी मंत्री म्हणून जे ही मंदिर निर्माणासाठी मदत करता येईल ते मी करेल आणि समाजाच्या उन्नतीसाठी न्याय हक्क अधिकारासाठी मी सदैव तत्पर असून समाजानी माझ्यावर विश्वास ठेवावा सर्व प्रश्न मार्गी लावण्याची जबाबदारी माझी असेल असे मत राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केले. या वेळी धर्मगुरू शेखर महाराज , महंत सिद्धलिंग महाराज, धर्मगुरू रायसिंग महाराज महंत हिमत महाराज,यांनी समाजाला दिशा देण्यासाठी व मंदिर निर्माण करून धर्मसत्ता मजबूत करून समाजाचा विकास साधता येईल आणि समाज बांधवांनी वाईट व्यसना पासून दूर राहवे असे आपल्या आशीर्वात भाषणात त्यांनी आपले मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे प्रस्तावना भाषणात पुणे जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण सांस्कृतिक धार्मिक स्थळ उभे करण्यासाठी मंत्री संजय राठोड यांनी विशेष लक्ष पुणे जिल्ह्यात द्यावे असे मत राष्ट्रीय बंजारा परिषदचे प्रदेश प्रवक्ता अमोल पवार यांनी व्यक्त केले.व मंदिर कमिटीच्या वतीने किशोर चव्हाण,विठ्ठल चव्हाण ,भारत जाधव ,रामसिंग खेतावत, परशुराम पवार व सर्व मंदिर कमिटी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत सत्कार करून आभार व्यक्त केले आहे.सूत्रसंचालन रमेश राठोड,किशोर चव्हाण यांनी केले तर आभार पवन चव्हाण , मिथुन राठोड यांनी मानले आहे.



कडेपूरला राज्यस्तरीय कविसंमेलन

विटे (प्रतिनिधी) : कडेगाव तालुक्यातील कडेपूर येथे शुक्रवारी (27 फेब्रुवारी) राज्यस्तरीय कविसंमेलन होणार आहे. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये निमंत्रितांचे राज्यस्तरीय कवी संमेलन व कवी पांडुरंग माळी काव्यरत्न पुरस्कार वितरण असा संयुक्त कार्यक्रम होणार आहे. ही माहिती आयोजक सदानंद माळी व प्राचार्य डॉ. लालासाहेब जाधव यांनी दिली. अंधकवी चंद्रकांत देशमुखे काव्य मंच सांस्कृतिक सभागृहात सकाळी दहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. हुतात्मा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनील फडतरे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाट्न होणार आहे. स्वागताध्यक्ष डॉ. लालासाहेब जाधव आहेत. अमृतवेल मीडियाचे प्रमुख धर्मेंद्र पवार प्रमुख पाहुणे आहेत. कविसंमेलनाचे अध्यक्ष भीमराव धुळू बुळू आहेत. कवी पांडुरंग माळी काव्यरत्न पुरस्कार यावर्षी प्रतिभा मगर (पुणे), कांचन मून (पुणे), अनिसा शेख (दौड), सायराबानू चौगुले (माणगाव), दयासागर बन्ने (सांगली), मन्सूर जमादार (भिलवडी) यांना प्रदान करण्यात येणार आहे.

संत गाडगे बाबांनी जनमानसांना अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला

- प्राचार्य डॉ रामेश्वर पवार

परभणी,(अरविंद कांबळे) पूर्णा (जंक्शन) महान संत कर्मयोगी गाडगे बाबांनी यांनी जनमानसांना परिसर स्वच्छते सोबतच कर्मकांड मुक्तीचा आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला असे प्रतिपादन प्राचार्य डॉ रामेश्वर पवार यांनी केले .ते येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वच्छतेचा संदेश देवून प्रबोधन करणारे कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. प्राचार्य डॉ रामेश्वर पवार हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. महाविद्यालयाच्या वतीने कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी पुष्पहार अर्पण करून महाविद्यालयाच्या वतीने विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते जगदीश जोगदंड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे जगदीश जोगदंड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. संजय कसाब, डॉ.भारत चापके, प्रा.डॉ.भीमराव मानकरे , महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.संजय कसाब यांनी मांडले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रभाकर सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. दीपमाला पाटोदे यांनी मानले . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय कसाब, डॉ. भारत चापके , प्रा. सुरेश पवार , प्रा. विठ्ठल डाके, प्रा. रुपेश लोखंडे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

- तहसिलदार योगेश्वर टोंपे

विटे, ता. 24 (प्रतिनिधी) तहसील कार्यालय, खानापूर(विटा) मार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान (टप्पा-१)' अंतर्गत प्रत्येक मंडळ स्तरावर महसूल शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती तहसिलदार योगेश्वर टोंपे यांनी दिली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून, जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व महिलांसाठी महसूल विभागातील महत्त्वाच्या १५ सेवांचा लाभ एकाच दिवशी देण्यासाठी हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सर्व महसूल मंडळ व नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर समाधान शिबिरे आयोजित केली जाणार आहेत.अभियानाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे –मंडळ स्तरावर पूर्वतयारी दिनांक १८ फेब्रुवारी ते ५ मार्च २०२६ दरम्यान करण्यात येणार आहे. मार्च महिन्यातील शिबिरे ७ मार्च (शनिवार) व १४ मार्च (शनिवार) रोजी, एप्रिल महिन्यातील शिबिरे १० एप्रिल (शुक्रवार) व १७ एप्रिल (शुक्रवार) रोजी तसेच मे महिन्यात नगरपरिषद/नगरपंचायत स्तरावर शिबिरे ८ मे (शुक्रवार) व १५ मे (शुक्रवार) रोजी आयोजित करण्यात येणार आहेत.या शिबिरांमध्ये प्रलंबित फेरफार, ७/१२ मधील चुकीची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उताऱ्यांचे वाटप, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र, अकृषिक (NA) परवानगी, अकृषिक तरतुदीबाबत मार्गदर्शन व सुधारणा, 'सनद' प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघन प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप व ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी, तसेच भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणी 'कमी-जास्त पत्रके' तयार करून गाव दप्तर अद्यावत करण्याची कामे करण्यात येणार आहेत.तहसीलदार योगेश्वर टोंपे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, संबंधित तारखांना आपल्या मंडळ मुख्यालयी आयोजित होणाऱ्या शिबिरात आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून महसूल विभागाच्या सेवांचा लाभ घ्यावा. या उपक्रमाचा मुख्य उद्देश लोकांना त्यांच्या गावातच त्वरित व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे हा आहे.

प्राचार्य डॉ. अनिल निघोट यांचे पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन

(कैलास गायकवाड) लोणी प्रतिनिधी

दि २४ फेब्रुवारी मंचर ता.येथील डॉ.एम.ए.खान शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल नारायण निघोट यांनी जागतिक मराठी भाषा दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षकांसाठी लिहिलेल्या शैक्षणिक संदर्भपर आठ पुस्तकांचा भव्य प्रकाशन सोहळा कर्मवीर भाऊराव पाटील सभागृह अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता आयोजित केला आहे. प्राचार्य डॉ. अनिल निघोट यांनी एडव्हान्सड एज्युकेशनल सायकोलाजी लर्निंग एन्ड टिचींग, मोडर्न - एडव्हान्सड एज्युकेशनल मैनेजमेंट, भावनिक बुद्धिमत्ता आणि सहकार्यात्मक अध्ययन,इंडीयन नोलेज सिस्टीम इन एज्युकेशन, लर्निंग एन्ड टिचींग, असेसमेंट एन्ड ईव्हेल्युएशन फोर लर्निंग, अध्ययन आणि अध्यापन, अध्ययनासाठी मुल्यांकन आणि मुल्यमापन अशी आठ पुस्तके लिहिली आहेत.



अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात डॉ. पांडुरंग गायकवाड, डॉ.गीता शिंदे, प्राचार्य डॉ. एन.एस.गायकवाड, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.बी.पी गार्डी , ज्येष्ठ पत्रकार डी.के.वळसे पाटील प्राचार्य डॉ.बी.एस.मुरादे, प्राचार्य डॉ . कैलास दौंडकर प्राचार्य नितीन बाणखेले मान्यवरांच्या शुभहस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा होणार असून,डॉ. एम.ए.खान शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शिक्षकवृंद ,आजी माजी विद्यार्थी व संस्था सचिव शाहिद सय्यद यांची उपस्थिती असणार आहे.या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य डॉ.अनिल निघोट व प्रा सुरेखाताई निघोट, डॉ.सोनल, आकांक्षा व शैलेश अनिल निघोट यांनी केले आहे.

राष्ट्रीय महामार्ग वादाच्या भोवऱ्यात

(प्रदीप जोशी, सांगली जिल्हा प्रतिनिधी)

सांगली जिल्ह्यातील विटा शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग 160 च्या रुंदीकरणावरून सध्या मोठा पेच निर्माण झाला आहे. कोणतीही तडजोड न करता या मार्गाचे ठरल्याप्रमाणे रुंदीकरण व्हावे अशी येथे चर्चा आहे. तीस मीटर असलेला रस्ता कोणत्याही परिस्थितीत कोठेही कमी करू नये अशी बहुतेकांची मागणी आहे. विटा शहरातून पूर्वीचा राज्यमार्ग दहाची दर्जोन्नती होऊन नवीन राष्ट्रीय महामार्ग 160 झाला आहे. हा रस्ता मुख्य बाजारपेठ व राहिवासी भागातून जात असल्याने काही ठिकाणी रुंदी कमी जास्त दिसून येत आहे. वाहतूक समस्या सोडवायची असेल तर कोणत्याही प्रकारे रस्ता रुंदीकरणाच्या कामात तडजोड होता कामा नये. अशी भूमिका व्यक्त केली जात आहे. आता सत्तारूढ व विरोधी गट आमने सामने आले आहेत. कोणाच्याही मिळकतीला बाधा येईल याची



आता काळजी करण्यात काय अर्थ? बांधकामाला यापूर्वी कशी परवानगी दिली गेली. रस्त्याचा मार्ग कमी जास्त करण्यात काय अर्थ? उलट वाहतुकीची कोंडी त्यामुळे अधिक होईल. याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. रिंग रोडला विरोध, अतिक्रमणे हटवण्याला विरोध, वाहतूक कोंडी सोडवण्याला विरोध करून आपण काय साध्य करणार आहोत. आज शहरातील सर्वच रस्ते कमी जास्त प्रमाणात रुंद अरुंद आहेत. रस्त्याच्या कडेला गाड्या पार्क केलेल्या असतात. पार्किंगची कोणतीही सोय नाही. घरात चारचाकी आहे मात्र पार्किंग ठेवलेले नाही. रस्त्यावर ज्या गाड्या पार्क केल्या जातात त्यांच्यावर संबंधितानी आजवर कधीही कारवाई केली नाही.राष्ट्रीय महामार्गांवर आता बरीच चर्चा झाली आहे.एकमेकांवर आरोप प्रत्यारोप झाले आहेत. कोणाचे तरी हित जपण्यासाठी संपूर्ण गावाला वेठीस का धरले जाते याचा उलगडा होत नाही. अतिक्रमणे कोणाचीही असोत ती निघालीच पाहिजेत. तासगाव, कडेगाव, सांगली, इस्लामपूर, सर्व ठिकाणी रस्त्याच्या मध्यभागी बहुतांशी ठिकाणी दुभाजक आहेत. विट्यात मात्र कराड रस्त्याला लोकांची मागणी असूनही ही सुविधा होत नाही. चिरवळ ते बसस्थानक नीट चालता देखील येत नाही. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पार्किंग. तीच आवस्था सर्वत्र आहे.चारी बाजूचे रस्ते मोठे करण्याची गरज आहे. अन्यथा फ्लाय ओव्हरची रचना करावी. व्यापारी वर्गाची अतिक्रमणे प्रथम दूर केली पाहिजेत. दुकान त्याच्यापुढे अतिक्रमण केलेला कट्टा असे सर्रास चित्र आहे. राष्ट्रीय महामार्गाची रस्त्याची मापे कोणी बदलली. बदलामागचे कारण काय याची आता सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे. विरोध गटातील व काही ग्रामस्थांनी मुख्याधिकारी यांची या संदर्भात भेट घेतली. दरम्यान माजी उपनगराध्यक्षा सौ प्रतिभा चोथे यांनी जनहितार्थ प्रसिद्ध केलेल्या पत्रकात राष्ट्रीय महामार्गाची सर्व माहिती विषद केली आहे. मोबाईलवर ती सर्व नागरिकांना वाचवयास मिळत आहे.

वसमत पंचायत समिती कर्मचाऱ्यांचे एक दिवस काम बंद आंदोलन

हिंगोली/ रुपेश एंगडे महाराष्ट्रातील लिपिक संवर्ग शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर झालेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेने सर्व जिल्हाधिकारी यांना दिनांक 23 फेब्रुवारी 2026 रोजी आक्रोश मोर्चा काढण्याचे निवेदन दिले असता या आंदोलनाला पाठिंबा म्हणून वसमत येथील या संघटनेच्या शाखेकडून वसमत पंचायत समिती समोर एक दिवस काम बंद करून आंदोलन करण्यात आले आहे. या आंदोलनामुळे पंचायत समितीच्या कार्यालयीन कामकाजावर परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले या आंदोलनात कर्मचारी क्यॅदलवार, सिंगनवाड, सांगळे, गायकवाड, दळवी, परशल्लू, जाधव, एंगडे आदि कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता.



शिवजयंतीनिमित्त नांदेड सिटीमध्ये भव्य रक्तदान व आरोग्य शिबिर

प्रतिनिधी (कांताभाऊ राठोड)

नांदेड सिटी, पुणे येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर तसेच मोफत ब्लड चेकअप, सर्वसाधारण आरोग्य तपासणी आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन उत्साहात करण्यात आले.या सामाजिक उपक्रमासाठी प्रख्यात समाजसेवक संजय खंडारे यांनी पुढाकार घेतला. समाजामध्ये आरोग्याबाबत जागृती निर्माण व्हावी व गरजू नागरिकांना मोफत तपासणीची सुविधा मिळावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



अनेक युवक-युवती व नागरिकांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचा आदर्श घालून दिला. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली रक्त तपासणी, सर्वसाधारण आरोग्य तपासणी तसेच नेत्र तपासणी करण्यात आली.रक्तदात्यांच्या सेवाभावाचा सन्मान म्हणून प्रत्येक रक्तदात्यास महाराजांची आकर्षक मूर्ती, बॅग व वॉटर बॉटल भेट देण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजहितासाठी असे कार्यक्रम सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.या उपक्रमामुळे शिवजयंतीचा उत्सव सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

पुण्यात शासकीय अधिकाऱ्यांचे संमेलन

(प्रतिनिधी, प्रदीप जोशी)

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळख असणाऱ्या पुण्यात विविध साहित्य संमेलने आयोजित केली जातात. मात्र, यंदा पुणेकरांना एक आगळावेगळा अनुभव मिळाला तो म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्य संमेलनाचा. संवाद पुणे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाचे दुसरे वर्ष असून, शहरातील बालगंधर्व रंगमंदिर येथे हे बहुचर्चित संमेलन पार पडले . प्रशासकीय जबाबदाऱ्यांसोबत साहित्याची नाळ जपणाऱ्या अधिकाऱ्यांच्या लेखनकृतींची मेजवानी यावेळी पुणेकरांना अनुभवता येत आली. या संमेलनात महाराष्ट्रासह ओडिशा, तेलंगणा आदी चार राज्यांतील 60 हून अधिक शासकीय अधिकारी सहभागी झाले होते. मराठी भाषेला नुकताच अभिजात दर्जा मिळाल्यानंतर अशा प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन झाल्याने या संमेलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. परिसंवाद, कवी संमेलन, कथाकथन, चर्चासत्रे अशा विविध कार्यक्रमांद्वारे अधिकाऱ्यांनी आपल्या साहित्यिक अभिव्यक्तीचे दर्शन घडवले.संवाद पुणे, यशदा आणि पुणे महापालिका यांच्या सहकार्याने हे संमेलन आयोजित करण्यात आले. प्रशासकीय क्षेत्रातील अधिकारी नियमितपणे लेखन करत असले तरी त्यांच्या कामाच्या व्यापामुळे त्यांच्या साहित्याला व्यासपीठ मिळणे कठीण होते. ही उणीव भरून काढण्यासाठी मागील वर्षापासून या संमेलनाची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती आयोजक सुनील महाजन यांनी दिली. देशातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे हे पहिलेच साहित्य संमेलन असून, अधिकाऱ्यांच्या



संवेदनशील लेखनाला योग्य मंच देणे हा आमचा उद्देश आहे, असे ते म्हणाले.संमेलनाचे अध्यक्ष तथा तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक महेश भागवत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अधिकारी जीवनातील अनुभव साहित्याला कसे समृद्ध करतात, यावर भाष्य केले. अधिकाऱ्यांना पुस्तकांपेक्षा माणसे अधिक वाचायला मिळतात. विविध स्तरांतील लोकांच्या भावना, समस्या आणि संघर्ष जवळून पाहताना मनात साठलेले अनुभव लेखनातून व्यक्त होतात, असे त्यांनी सांगितले. गेली 26 वर्षे हैदराबादमध्ये कार्यरत असतानाही मराठी आणि मातीतली नाळ जपली असल्याचे त्यांनी नमूद केले.मागील वर्षीचे संमेलनाध्यक्ष शेखर गायकवाड यांनी अधिकाऱ्यांनी लेखनाच्या माध्यमातून समाजाशी संवाद साधण्याची गरज व्यक्त केली. अधिकाऱ्यांचा जनतेशी सर्वाधिक संपर्क येतो. त्यामुळे त्यांच्या अनुभवातून समाजाचे वास्तव प्रभावीपणे मांडले जाऊ शकते, असे ते म्हणाले.या संमेलनात सहभागी अधिकाऱ्यांच्या पुस्तकांना 'वाङ्मय पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार असल्याची घोषणा आयोजकांनी केली. विविध राज्यांतील प्रतिनिधी, आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी एकत्र येऊन साहित्य, प्रशासन आणि समाज यांचा संगम घडवून आणत असल्याने हा उपक्रम चर्चेचा विषय ठरत आहे.पुणे शहरात अनेक साहित्यिक मेळावे होत असले तरी अधिकाऱ्यांचे हे अनोखे संमेलन विशेष ठरले आहे. प्रशासकीय जबाबदाऱ्यांच्या कठोर चौकटीत काम करत असतानाही संवेदनशील लेखन जपणाऱ्या अधिकाऱ्यांना या माध्यमातून एक सशक्त व्यासपीठ मिळाले आहे. प्रशासन आणि साहित्य यांचे हे युनिक कॉम्बिनेशन पुणेकरांसाठी निश्चितच बौद्धिक मेजवानी ठरत आहे.प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उचलली लेखणी, पुणेकरांसाठी खास मेजवानी, हे पहिल्यांदाच घडतंय.

सेलूच्या मुख्य रस्त्याने बाजार दिवशी घेतला अखेर मोकळा श्वास

नगरपंचायत प्रशासनाची धडक कारवाई

सेलू. (प्रशांत झाडे) गेल्या अनेक वर्षांपासून सेलू शहरातील मुख्य रस्त्यावर आठवडी बाजाराच्या दिवशी होणारी वाहतुकीची कोंडी अखेर फुटली आहे. नगरपंचायत प्रशासनाने मंगळवारी केलेल्या नियोजनबद्ध कारवाईमुळे शहरातील मुख्य रस्त्याने मोकळा श्वास घेतला असून, वर्षानुवर्षांची ही समस्या मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.सकाळी आठपासूनच प्रशासकीय यंत्रणा सतर्कमंगळवार, २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजेपासूनच नगरपंचायत प्रशासनाचे अधिकारी आणि कर्मचारी रस्त्यावर उतरले होते. मुख्य रस्त्यावर दुकान थाटणाऱ्या विक्रेत्यांना आठवडी



बाजाराच्या नियोजित जागी स्थलांतरित होण्यासाठी कर्मचाऱ्यांमार्फत मदत करण्यात आली. मुख्याधिकारी अनुप अग्रवाल आणि पोलीस निरीक्षक देवेन्द्र ठाकूर यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली.सेलूच्या मुख्य रस्त्यावर आठवडी बाजाराच्या दिवशी मोठी गर्दी होत असे. त्यातच रस्त्याच्या दुतर्फा दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी राहत असल्याने सर्वसामान्य जनतेला चालणेही कठीण झाले होते. या त्रासामुळे शहरातील जनतेची प्रशासनाकडे मोठी ओरड होती. आजच्या धडक मोहिमेमुळे रस्ता पूर्णपणे मोकळा झाला असून वाहतूक सुरळीत झाली आहे.या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे जाहीर सूचना,ध्वपिक्षेपकद्वारे जाहीर आव्हाहन करून केवळ दुकाने हटवली नाहीत, तर विक्रेत्यांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांना योग्य ठिकाणी जागा मिळवून देण्यासाठी कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. यामुळे ग्राहक आणि दुकानदार या दोघांनीही प्रशासनाचे आभार मानले आहेत.या कारवाईच्या वेळी मुख्याधिकारी अनुप अग्रवाल, पोलीस निरीक्षक देवेन्द्र ठाकूर व त्यांचे सहकारी, तसेच शहरातील पत्रकार अनिल वांदिले, सतीश वांदिले, आशिष धापुडकर आणि इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.थोडक्यात सांगायचे तर.. प्रशासनाच्या या इच्छाशक्तीमुळे सेलूकरांचा मंगळवारचा प्रवास आता सुखकर होणार आहे. नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाच्या या संयुक्त कामगिरीचे शहरभर कौतुक होत आहे.

मंगेश काळे यांना 'उत्कृष्ट पत्रकार' पुरस्काराने गौरव

सेलु. (प्रशांत झाडे) आपल्या लेखणीच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावणारे आणि पत्रकारिता क्षेत्रात स्वतंत्र ठसा उमटवणारे मंगेश काळे यांना व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार समितीच्या वतीने 'उत्कृष्ट पत्रकार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. देवळी येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित पत्रकार स्नेह मिलन सोहळ्यात हा गौरव सोहळा पार पडला.आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, मोहनबाबू अग्रवाल आणि ज्येष्ठ पत्रकारांच्या हस्ते मंगेश काळे यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला.पत्रकारितेचा १५ वर्षांचा यशस्वी प्रवासमंगेश काळे यांनी २०१० मध्ये सेलू तालुक्यातील हिंगणी येथून पत्रकारितेचा प्रवास सुरू केला. 'दैनिक सकाळ'च्या माध्यमातून त्यांनी गेल्या १२ ते १५ वर्षात गोरगरीब, दलित आणि वंचित घटकांच्या समस्यांना सातत्याने वाचा फोडली.प्रशासकीय स्तरावर प्रकरणांचा पाठपुरावा करून अनेकांना न्याय मिळवून दिला.निसंकोच आणि निर्भिड पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला.या सोहळ्याला



देवळीचे नगराध्यक्ष किरण ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेश सचिव राणा रणनवरे, राज्य संयोजक किशोर कारंजेकर, जिल्हाध्यक्ष एकनाथ चौधरी आणि सेलू तालुकाध्यक्ष सचिन धानकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती.मंगेश काळे यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे विजय माहुरे, अभय बेदमोहता, भारत घवघवे यांच्यासह जिल्ह्यातील पत्रकार वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त ऐंजल पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूल, केळझर येथे स्वच्छता अभियान उत्साहात

सेलू (प्रशांत झाडे) श्री. संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त ऐंजल पॅराडाईज इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केळझर येथे स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. "स्वच्छता हीच सेवा" हा संदेश देत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला.कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष





नरेंद्र सूर्यवंशी यांनी आपल्या भाषणात संत गाडगे महाराजांनी दिलेला स्वच्छतेचा व समाजसेवेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला. त्यानंतर शाळेच्या आवारात, वर्गखोल्यांमध्ये तसेच परिसरातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.विद्यार्थ्यांनी हातात झाडू घेऊन रस्ते, मैदान व परिसर स्वच्छ केला. प्लास्टिक व कचरा वेचून योग्य प्रकारे त्याची विल्हेवाट लावण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व स्वच्छतेबाबतची जबाबदारी निर्माण झाली.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्वच्छता राखण्याची शपथ घेतली. या उपक्रमाचे पालक व स्थानिक नागरिकांनीही कौतुक केले. विद्यालयाच्या वतीने असे सामाजिक उपक्रम पुढेही राबविण्यात येतील, असे प्राचार्यांनी सांगितले.

अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यवतमाळ जिल्हा अव्वल

यवतमाळ,दि.२३ (जिमाका) : यंदाच्या तीन दिवसीय अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ येथे उत्साहात पार पडल्या. या दोन्ही स्पर्धेत विभागातील पाचही जिल्ह्यांमधून यवतमाळ जिल्ह्याने अव्वल स्थान गाठत पहिल्या क्रमांकाचे बक्षिस पटकावले. तर सर्वसाधारण क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्ह्याने व सांस्कृतिक स्पर्धेत अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाने द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळवले. या बक्षिसांचे वितरण विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या हस्ते करण्यात आले.

या बक्षिस वितरण सोहळ्याला जिल्हाधिकारी विकास मीना, विभागीय अपर आयुक्त संजय जाधव, विरेंद्र हजारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिलीप कोलेवाड आदी मान्यवर उपस्थित होते. "अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात व आनंदी वातावरणात झाल्याचा आनंद आहे. या समर्पण भावना अविस्मरणीय असून त्यांचा उत्साह कौतुकास्पद आहे. हीच भावना आणि



स्पर्धांमध्ये अधिकारी- कर्मचारी ज्या उत्साह व आनंदाने सहभागी झाले, तोच उत्साह व आनंदी वातावरण नेहमी कायम ठेवावे आणि खिलाडूवृत्तीने नियमित कामकाज करावे. तसेच या स्पर्धेत जे सहभागी झाले नाही त्यांनाही प्रोत्साहित करावे. जीवनात नेहमी आनंदी राहून उत्साहाने आपले कामकाज करावे", असे आवाहन विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी यावेळी केले. "ही स्पर्धा कौटुंबिक वातावरणात झाली. या स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, वचनबद्धता, उत्साहाची प्रशासनाच्या नियमित कामकाजात अंमलबजावणी करावी. मैदानावर जिंकण्यासाठी शिस्त, टिम वर्क आणि नेतृत्व गुण महत्त्वाचे असतात ते नियमित प्रशासनात आण्यासाठी लक्ष्य केंद्रीत करावे. तसेच जनतेच्या कामांसाठी हे गुण आत्मसात करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले.

या स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यातील चमू सहभागी झाले होते. क्रीडा स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास ५९, अकोला ८५, अमरावती २०१, यवतमाळ २८५, बुलढाणा ७८ आणि वाशिम १०९ अशी अंतिम गुणतालिका जाहीर करण्यात आली. तसेच सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास २४४.५ व यवतमाळ जिल्ह्यास २६४.५ गुण मिळाले. या बक्षिस वितरण सोहळ्यात विविध सांघिक व एकल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांमधील विजेता, उपविजेत्यांचा पारितोषिक देवून सन्मान करण्यात आला. यात कबड्डी, क्रिकेट, वॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, खो-खो आदी क्रीडा स्पर्धा व नृत्य, अभिनय, गीतगायन, नाटक आदी सांस्कृतिक स्पर्धेतील विजेत्यांचा समावेश होता. या सोहळ्याचे प्रास्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी केले. तहसिलदार योगेश देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.या बक्षिस वितरण सोहळ्याच्या अंतिम टप्प्यात राष्ट्रगीताने महसूल महोत्सवाचा समारोप करण्यात आला.

वैद्यकीय देयकांचा निपटारा आता होणार 'महाकर्मी' पोर्टलद्वारे

मुंबई, दि.२४ : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शासकीय कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'महाकर्मी मेडिकल बिल क्लेम वेब पोर्टल' तसेच राज्यातील वैद्यकीय मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक सक्षम करणाऱ्या 'वैद्यकीय अधिकारी मॅनेजमेंट सिस्टीम (व्हीएएमएस)' या डिजिटल पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला. आरोग्य प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे मुख्य सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी तसेच सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य सेवा उपसंचालक दुरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी मंत्री आबिटकर यांनी सांगितले की, गेल्या अधिवेशनात तीन महिन्यांपूर्वी सभागृहामध्ये यासंदर्भात आश्वासन दिले होते. ते आश्वासन आरोग्य विभागाने आता पूर्ण केले आहे. महाकर्मी हा कर्मचारी हिताचा डिजिटल निर्णय विभागाने घेतला आहे. शासन आपल्या कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांना वेळेवर आणि पारदर्शक सेवा देणे ही आमची बांधिलकी आहे. या उपक्रमामुळे प्रतिपूर्ती प्रक्रियेत सुसूत्रता येऊन शासकीय कर्मचाऱ्यांचा विश्वास अधिक बळकट होणार आहे. कर्मचाऱ्यांची सर्व बिले यापुढे ऑनलाईन पद्धतीनेच निघाली पाहिजेत. त्यासाठी आपल्याकडे असलेले डेटा अचूक असावा. विभागाने यासंदर्भात योग्य ती पावले उचलावीत. वैद्यकीय देयके देण्याच्या बाबतीत विलंब होणार नाही याची जिल्ह्य शल्यचिकित्सकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे मंत्री गोरे म्हणाले.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती जलद, पारदर्शक व सुलभ करण्यासाठी 'महाकर्मी' हे मेडिकल बिल क्लेम वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे. 'महाराष्ट्र कर्मचारी रुग्ण मित्र' या संकल्पनेवर आधारित ही डिजिटल सुविधा कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा देणारी ठरणार आहे. आता वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीचे अर्ज ऑनलाईन सादर करून त्यांचा निपटारा निश्चित कालमर्यादेत करण्यात येणार आहे. यामुळे कार्यालयीन दिरंगाई कमी होऊन प्रक्रियेला वेग येणार आहे. अधिक माहितीसाठी www.mahakarmi.com या संकेतस्थळाला भेट देता येणार आहे.



याचबरोबर राज्यातील वैद्यकीय मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी 'वैद्यकीय अधिकारी मॅनेजमेंट सिस्टीम' (व्हीएएमएस) हे पोर्टल सुरू करण्यात आले आहे. या प्रणालीद्वारे पदनिहाय माहिती, तज्ज्ञ व विशेषज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, संस्थात्मक माहिती, सेवा तपशील तसेच अनुपस्थिती नियंत्रण यांची अचूक नोंद ठेवता येणार आहे. अधिक माहितीसाठी www.vams.org.in या संकेतस्थळाला भेट देता येईल. या प्रणालीमुळे जिल्हानिहाय तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता तात्काळ ओळखणे शक्य होणार असून ग्रामीण व दुर्गम भागात वैद्यकीय सेवांचे प्रभावी नियोजन करता येणार आहे. बदली, पदोन्नती व नवीन नियुक्त्यांची शास्त्रोक्त प्रक्रिया राबविता येणार असून डेटा-आधारित मनुष्यबळ व्यवस्थापनामुळे रुग्णसेवेचा दर्जा उंचावणार आहे. प्रशासकीय कामात गती आणण्यासाठी या पोर्टलमध्ये विविध प्रकारचे 'रिअल-टाइम' अहवाल तयार करण्याची सुविधा देण्यात आली आहे, ज्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे

पदनिहाय माहिती: जिल्हा निहाय रिक्त व भरलेली पदे, गट 'अ' आणि 'ब' पदे, तसेच प्रवर्गानुसार पदांचा तपशील.

तज्ज्ञ आणि विशेषज्ञ उपलब्धता: विशेषज्ञ निहाय रिक्त व भरलेल्या पदांची माहिती आणि डॉक्टरांची शैक्षणिक अर्हता.

संस्थात्मक माहिती: जिल्हा निहाय आरोग्य संस्थांचे विभाग आणि संस्था प्रकारानुसार (पीएचसी, आएच, डीएच) वर्गीकरण.

सेवा तपशील: नियुक्ती प्रकारानुसार वैद्यकीय अधिकारी, सेवाकाल निहाय माहिती आणि आगामी काळात निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांची यादी.

अनुपस्थिती नियंत्रण: जिल्हा निहाय सध्या कार्यरत नसलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचा अचूक डेटाबेस.

प्रशासकीय फायदे : या पोर्टलमुळे आरोग्य विभागाला कोणत्या जिल्ह्यात कोणत्या तज्ज्ञांची कमतरता आहे, हे तात्काळ समजणार आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागात वैद्यकीय सेवांचे नियोजन करताना "संस्था प्रकार निहाय" आणि "विशेषज्ञ निहाय" अहवालांचा मोठा उपयोग होणार आहे. यामुळे डॉक्टरांच्या बदल्या, पदोन्नती आणि नवीन नियुक्त्यांची प्रक्रिया अधिक शास्त्रोक्त पद्धतीने राबवता येईल. डिजिटल गव्हर्नन्सचे उत्तम उदाहरण: " व्हीएएमएस पोर्टलमुळे आता कागदोपत्री माहिती गोळा करण्यात होणारा विलंब टळणार आहे. राज्यातील संपूर्ण वैद्यकीय मनुष्यबळाचे व्यवस्थापन आता डेटा-आधारित पद्धतीने होईल, ज्यामुळे रुग्णसेवेचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. राज्यातील आरोग्य क्षेत्रात डिजिटल परिवर्तनाची नवी दिशा देणारे हे दोन्ही उपक्रम कर्मचारी हित आणि रुग्णसेवा गुणवत्ता या दुहेरी उद्दिष्टांना पूरक ठरणार असून 'निरोगी महाराष्ट्र' घडविण्यास हातभार लावणार आहेत.

SQAAF अंतर्गत अण्णासाहेब कल्याणी विद्यालयाला A+ श्रेणी

(अनिल वीर) सातारा : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (SCERT) मार्फत राबविण्यात येणाऱ्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत राज्यभरात करण्यात आलेल्या बाह्य मूल्यांकनात जिल्ह्यातील १७ शाळांना मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये अण्णासाहेब कल्याणी विद्यालय या विद्यालयाने A + श्रेणी मिळवत जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला आहे. SQAAF अंतर्गत शाळांची स्व-मूल्यांकन प्रक्रिया, त्यानंतर तज्ज्ञांकडून बाह्य मूल्यांकन आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित श्रेणी निश्चिती अशा टप्प्यांतून ही प्रक्रिया राबविण्यात आली. शैक्षणिक गुणवत्ता, व्यवस्थापन कार्यक्षमता, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, पायाभूत सुविधा व शालेय वातावरण या विविध घटकांच्या आधारे शाळांचे मूल्यमापन करण्यात आले.या अभिमानास्पद यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक कार्याचा गौरव राज्यस्तरावर अधोरेखित झाला आहे. यावेळी मुख्याध्यापक बी. एन. पवार यांचा डॉ अनिल पाटील यांनी बुके देऊन सत्कार केला. आपल्या मनोगतात डॉ. अनिल पाटील यांनी सर्वांचे कौतुक तर केलेच पण त्याबरोबर भविष्यासाठी दिशाही दिली. याप्रसंगी आपल्या मनोगतात मुख्याध्यापक बी. एन. पवार यांनी संस्थेचे सर्व पदाधिकारी , विद्यालयाचे उपमुख्याध्यापक, दोन्ही पर्यवेक्षक,सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे योगदान हेच या यशाचे खरे श्रेय असल्याचे नमूद केले. विद्यालयाच्या प्रगतीचा हा सुवर्णक्षण पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या यशामुळे संपूर्ण शैक्षणिक परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही गुणवत्ता आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा ध्यास कायम ठेवण्याचा निर्धार विद्यालयाने व्यक्त केला आहे. प्रास्ताविक विद्यालयाच्या पर्यवेक्षिका सौ.शशिकला घोरपडे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक उपेंद्र घाडगे यांनी मानले.सदरच्या कार्यक्रमास विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रशांत पाटील,डॉ.राजेंद्र मोरे ऑडिटर रयत शिक्षण संस्था तसेच सहायक विभागीय अधिकारी एन.टी.निकम यांची उपस्थिती होती.सूत्रसंचलन सौ.बर्गे एस एस यांनी केले.



मुख्याध्यापक पवार यांचे स्वागत प्रसंगी अनिल पाटील शेजारी मान्यवर व शिक्षकवृंद.

शहिद अशोक कामटे यांचा जन्मदिन साजरा !

सातारा : शहिद अशोक कामटेयांचा जन्मदिवस येथील डॉ. आंबेडकर पुतळ्याजवळ साजरा करण्यात आला. शहिद अशोक कामटे यांचा मृत्यू २६ नोव्हेंबर २००८ रोजी झाला.तेव्हा ते मुंबईचे ॲडिशनल पोलिस कमिशनर होते. त्यांचा जन्म एका मराठा कुटुंबात २३ फेब्रुवारी १९६५ रोजी झाला.त्यांचे शिक्षणराजकोटच्याराजकुमार कॉलेजमध्ये झाले. पुढे ५ वर्षांसाठी ते कोडाईकॅनाल आंतरराष्ट्रीय प्रशालेत दाखल झाले होते.त्यांना कॅम्प रायझिंगसनमधून आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळाली व ते १९८२ मध्ये उत्तीर्ण झाले. त्यांनी १९८५ मध्ये सेंट झेवियर महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. त्यांनी त्यांचे पदवीनंतरचे शिक्षण सेंट स्टीफन्स महाविद्यालयातून १९८७ साली पूर्ण केले.त्यांनी भारताचे पेरू मध्ये झालेल्या junior power lifting championship मध्ये प्रतिनिधित्व केले होते. अशोक कामटे यांच्या पश्चात पत्नी विनिता, मुले राहुल व अर्जुन आहेत. त्यांचे वडील एम.आर. कामटे भारतीय सैन्याचे निवृत्त अधिकारी होते. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला. दहशतवाद्यांशी लढताना ते



शहीद झाले. त्यांच्याबरोबर विजय साळस्कर, हेमंत करकरे,मेजर संदीप ऊनीकृष्णन व तुकाराम ओंबळे हेही शहीद झाले होते. अशोक कामटे यांना पोलीस दलातील दैदिप्यमान कारकीर्दीबद्दल अनेक सन्मान देऊन गौरविण्यात आले होते.१९९५ मध्ये नक्षलवादविरोधी कारवायांसाठी " विशेष सेवा पुरस्कार",१९९९ मध्ये "संयुक्त राष्ट्र पुरस्कार"आणि संयुक्त राष्ट्रासाठी,"विदेशी सेवा पुरस्कार",२००५ मध्ये नक्षलवादविरोधी कारवायांसाठी "आंतरिक सुरक्षा पदक",२००६ मध्ये "पोलीस पदक", २००८ मध्ये मरणोत्तर "अशोकचक्र" देऊन सन्मानित करण्यात आले. अशोक कामटे सातारा येथे जिल्हा पोलीस अधीक्षक होते. सांगली येथे त्यांच्या नावाने दरवर्षी मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली जाते. भुईंज येथील किसनवीर सातारा सहकारी साखर कारखाना येथे भव्य शहीद स्मारक उभारले आहे. याठिकाणी आपण प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे. अशोक कामटे तसेच सर्वच शहिदाप्रति आदर व्यक्त करीत सर्वच शहिदांना अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकपर माहिती अनिल वीर यांनी कथन केली.प्रथमतः डॉ.आंबेडकर पुतळ्यास डॉ.दीपक माने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यांच्यासोबत गणेश कारंडे,ऍड.वहागावकर व प्रकाश खटावकर होते. थेरो दिम्पकर यांच्या अधिपत्याखाली संपूर्ण विधी पार पाडला. सदरच्या कार्यक्रमास सम्यक ज्येष्ठ नागरिक संघाचे बी.एल. माने,प्रभाकर बनसोडे, उत्तम पोळ,विलास कांबळे, ऍड. प्रियंका गडदे,अंकुश (भाऊ) धाइंजे,वामन गंगावणे, वामन म्हस्के आदी विविध क्षेत्रातील मान्यवर,कार्यकर्ते, उपासिका व उपासिका उपस्थीत होते.

संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर संपन्न !

सातारा : रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे.या न्यायाने संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त गोडोली कामाटीपुरातील श्री. संत गाडगे महाराज समाज सेवा संस्थेत रक्तदान शिबिर येथील बालाजी ब्लड सेंटरच्यावतीने संपन्न झाले.तेव्हा १६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. याकामी,जनसंपर्क अधिकारी अमोल जाधव,टेक्निशियन निखिल कदम,साहिल वाघमारे,उदय फडतरे,निखिल माने,अभिजित नलवडे व संपूर्ण कर्मचारी यांनी काम पाहिले. यावेळी नगरसेवक कल्याण राक्षे,प्रा.श्रीधर साळुंखे,एसटी बसस्थानक नियंत्रक अशोक कोकाटे,मार्केट कमिटी वरिष्ठ अधिकारी चेतन पिसाळ, नगरसेविका ज्योत्स्ना शिंदे व शिल्पा माने,नगरसेवक राहुल पिसाळ,विंग जिल्हा परिषद गटाच्या शैलजा शिंदे व ग्रामसेवक राजेंद्र राऊत,बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर, श्री.संत गाडगे महाराज समाज सेवा संस्थेचे जिल्हाध्यक्ष दिलीप काटकर,महिलाध्यक्षा ऍड. रोहिणी शंतनू राक्षे,महाराष्ट्र परिट सेवा मंडळाचे जिल्हाध्यक्ष महेश सुळे,सातारा जिल्हा लॉ. संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत शेडगे,ओ बीसी संघटनेचे रामचंद्र बनवडे (उपाध्यक्ष) ,प्रमोद क्षीरसागर (महासचिव),नामदेव क्षीरसागर,सौ.हजारे मॅडम, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर बनसोडे,राष्ट्रोत्सवचे ऍड.विलास वहागावकर आदी जिल्ह्यातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


रक्तदात्यासह रक्तदानप्रसंगी मान्यवर व कर्मचारी

भाजपा किसान मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी रामकृष्ण वेताळ

ओगलेवाडी : कराड उत्तरचे युवा नेते आणि उत्तरचा स्वाभिमान अशी ओळख निर्माण झालेले रामकृष्ण वेताळ यांची निवड भाजपा किसान मोर्चा प्रदेशाध्यक्षपदी झाली आहे.भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी याबाबतची घोषणा नुकतीच केली आहे.त्यामुळे रामकृष्ण वेताळ प्रेमी नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. रामकृष्ण वेताळ यांनी या अगोदर भाजपा किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस, सातारा जिल्हा उपाध्यक्ष, कराड शेती उत्पन्न बाजार समिती तज्ञ संचालक अशा विविध पदावर काम केले आहे.या सर्व ठिकाणी केलेल्या उत्कृष्ट कामामुळे त्यांची पक्षाने दखल घेतली आहे. कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात पक्ष बांधण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम हे वरिष्ठांना चांगलेच ज्ञात असल्याने राज्य पातळीवरील संघटनांमध्ये त्यांना चढत्या क्रमाने काम करण्याची संधी मिळत आहे. जिल्हा परिषद निवडणुकीम ध्ये अन्याय होत असल्याने त्यांनी पक्षविरोधी काम केल्याचा ठपका ठेवून त्यांना पक्ष संघटनेतून निष्काशीत केल्याचे पत्र सोशल मीडियावर फिरत होते.मात्र या निवडीमुळे राज्य पातळीवरील नेत्यांमध्ये



असलेली त्यांची पकड दिसून येत आहे. त्यांच्या निवडीमुळे शेतकरी आणि शेती संबंधीच्या समस्या शासन दरबारी मांडून सोडवण्यासाठी एक प्रामाणिक मनुष्य संघटनेला लाभलेला आहे. यामुळे किसान मोर्चा अतिशय प्रभावी काम करून शेतकरी आणि शेतीसाठी फायदेशीर निर्णय घेण्यासाठी शासनास मार्गदर्शन करेल. या निवडीसाठी रामकृष्ण वेताळ यांचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अध्यक्ष रवींद्र चव्हाण, नामदार चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे,सातारा लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे, भोसले सातारा जिल्हाध्यक्ष आमदार डॉक्टर अतुल भोसले, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी अभिनंदन केले आहे या निवडीमुळे कराड उत्तर मतदार संघामध्ये आनंदाचे भरते आले आहे. चौकट ..शेती आणि शेतकरी समृद्धीसाठी काम करणार. किसान मोर्चा चे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष हे पद देऊन वरिष्ठांनी दाखवलेला विश्वास सार्थ करणार आहे. त्याचप्रमाणे शेती आणि शेतकरी यांच्या समस्या सोडवण्यासाठी कायमस्वरूपी प्रयत्नशील राहणार आहे. महाराष्ट्र प्रदेश किसान मोर्चा चे कार्य हे संपूर्ण देशासाठी आदर्शवत राहील असे कार्य करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.मा. रामकृष्ण वेताळ प्रदेशाध्यक्ष किसान मोर्चा.

युनायटेड किंगडम मध्ये दुमदुमला शिवरायांचा जयघोष मराठी बांधवांनी साजरा केला शिवजन्मोत्सव सोहळा

कंधार (संतोष कांबळे) हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती महाराष्ट्रातच नव्हे तर जगभरातील विविध देशांत मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरी केली जाते. युनायटेड स्टेट्स लिव्हरपूलमध्ये स्थायिक झालेल्या मराठी बांधवांनी एकत्र येत शिवजयंती साजरी केली. त्याचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राच्या भुमीवर जन्माला आले असले तरी त्यांची कीर्ती परमुलुखात ही पसरलेली आहे. त्याची प्रचिती वारंवार पाहण्यात येते.जगातील ज्या ज्या देशात आपला मराठी महाराष्ट्रीयन माणूस बसला आहे तिथे तो शिवरायाचा जयजयकार करणारच.१९ फ्रेब्रुवारी शिवजयंतीनिमित्त लिव्हरपूल (युनायटेड किंगडम) येथील हिंदु मंदिरात छत्रपती शिवाजी जयंती महाराष्ट्र मंडळ, लिव्हरपूल यांच्या वतीने पारंपरिक पद्धतीनं साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सूरुवात ढोल ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचं पुजन आणि पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. 'जय भवानी..जय शिवाजी' अशा वेशभूषा डोळ्याचे पारणे फेडणारी होती. पारंपरिक ढोल-ताशाच्या गजरात शिवगर्जना करण्यात आली. लहान मुलांनी शिवचरित्रावर आधारित नाटिका सादर केली.



यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थितांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून परदेशातही मराठी संस्कृती आणि परंपरा जपण्याचा निर्धार व्यक्त केल. पूढील वर्षी मोठ्या विविध घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमला गेला. उपस्थित मान्यवरांनी शिवरायांच्या कार्याचा आणि हिंदरवी स्वराज्य स्थापनेच्या त्यांच्या पराक्रमाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. यावेळी तेथील महाराष्ट्रीयन नागरीकांनी केलेली आपली पारंपरिक तसेच महिलांनी लेझीम व पारंपरिक वेज्ञभूषेत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती परदेशातही जपली जात असल्याचे दर्शन घडवले. कार्यक्रमात शिवकालीन पोषाख परिधान करून शिवकालीन देखावा साकार करण्यात आलेल्य देखाव्यामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचं वातावरण तयार झाले होते. महाराष्ट्र मंडळ लिव्हरपूलचे पदाधिकारी आणि स्वयंसेवक यांच्या परिश्रमामळे हा कार्यक्रम प्रमाणात आयोजन "लिव्हरपूलमधील मराठी बांधवांनी एकत्र येत शिवजयंती उत्सव पारंपरिक पद्धतीनं साजरी करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं. पूढील वर्षीही यापेक्षा अधिक भव्य कार्यकम आयोजित करण्याचा संकल्प केला आहे. याआधी आषाढी एकादशीचा अनोखा सोहळा देखील उत्साहात पार पडला होता. लवकरच पांडुरंगाच्या पादुकांचं पूजन करून भव्य मंदिराची उभारणी करण्याचा मानस आहे. त्यासाठीची प्रक्रिया सुरू असून लवकरच मराठी बांधवांना देशाबाहेर पहिलं पांडुरंगाचे मंदिर उभारण्यात येणार आहे," अशी माहिती मंडळ, लिव्हरपूलचे (यूके) सदस्य डॉ. अनिल खेडकर यांनी दिली. या अभूतपूर्व सोहळ्यासाठी महाराष्ट्र मंडळ लिव्हरपूलच्या कार्यकर्त्यांनी अपार कष्ट घेतले. या यशस्वी आयोजनासाठी अनिकेत मोरे,मंगेश खरात,डॉ. अक्षय कुंटेवार,सुशांत हिर्लेकर, संतोष देसाई,स्वाती पटेल, काजल हिर्लेकर,मानसी मोरे, अनुपमा श्रोत्री,दिपाली कदम, स्मिता खरात,मौलिक पटेल, शुभम माने,विनीत सुवर्णा,रुपेश क्षीरसागर,अमोल शिर्के,सागर दात्रंगे,गंधर्व पुसळकर,सुजित शिरे,प्रांजली शिरे आणि संभाजी कदम यांचे विशेष परिश्रम घेतले.

ढोबळेवाडी (जारकरवाडी) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अभिनव पद्धतीने साजरा झाला शिवजयंती उत्सव सोहळा

(कैलास गायकवाड) ग्रामीण प्रतिनिधी आंबेगाव आंबेगाव पूर्व भागातील जारकरवाडी गावच्या ढोबळेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत अभिनव पद्धतीने शिवजयंती उत्सव सोहळा संपन्न करण्यात आला.यावेळी पारंपारिक पद्धतीने पालखीतून महाराजांच्या प्रतिमेचे मिरवणुक संपन्न झाली.गावातील सर्व महिला भगिनींनी ढोल ताशाच्या गजरात लेझीम खेळत,फुगड्या घालत, पाळणा गीत गात,फेर धरत मिरवणुकीत सहभाग नोंदवला.चिमुकल्या विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे पोवाडे गायले.जिल्हा परिषद



प्राथमिक शाळा ढोबळेवाडी या शाळेत नेहमीच संस्कारक्षम उपक्रम राबविले जात असतात.परिसर अभ्यास, प्रत्यक्ष कार्यभेट दौरा,दप्तरविना शाळा, आठवडे बाजार,खाऊ गल्ली, बोलक्या भिंती,सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम,वार्षिक स्नेहसंमेलन,विविध स्पर्धा परीक्षा व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शिका आदी उपक्रम राबविण्यात येत आहेत.कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांची आरती झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा प्रशासन,शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक अशोक हिंगे सर, सहशिक्षिका मनिषा हिंगे, अंगणवाडीताई लताश्री लबडे, निर्मला पाचपुते, गावातील सर्व तरुण सहकारी यांनी केले.